# मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.

निर्मलनगर, अहमदनगर (महा.) ☎: ०२४१-२४२३३९७

अर्जदाराचे नांव श्री. / सौ. ______________________

वय ____________ धंदा ______________________

कायमचा पत्ता ______________________ फोन नं. [ ]

कार्यालयीन पत्ता ______________________ फोन नं. [ ]

सोसायटीचा सभासद आहे काय ? ____________ असल्याल शेअर्स नं. [ ]

दरमहा उत्पन्न ______________________

## सोने / चांदीचे दागिने यांचे तारणावर कर्ज मिळण्याचा अर्ज

अर्जदाराचे संपूर्ण नांव ______________________

राहणार ____________ मी अर्ज करतो की, मला माझे स्वतःचे मालकीचे खालील सोने / चांदीच्या दागिन्यांच्या तारणावर रक्कम रुपये ____________ अक्षरी रुपये ______________________

पाहिजे आहेत या कर्जाचे सोसायटीने केलेले नियम मी वाचलेले असून त्याचप्रमाणे वर्तन करण्यास मी संमती देत आहे. सोसायटीच्या हल्ली अस्तित्वात असलेल्या व पुढे वेळोवेळी होणाऱ्या पोटनियम कर्ज विषयक नियमानुसार वागण्यास मी कबूल असून ते माझेवर बंधनकारक राहतील. असे मी कबूल करतो सदरचे कर्ज ____________ या कारणाकरिता पाहिजे आहे.

### सोसायटीत तारण ठेवावयाचे सोने /चांदीचे दागिण्याचा तपशील

| जिनसाचे वर्णन व तपशील | नग | एकंदर वजन | | निव्वळ सोने | | दर | मालाची किंमत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रॅम | मिली ग्रॅम | ग्रॅम | मिली ग्रॅम | | रुपये | पैसे |
| | | | | | | | | |

सदरहू सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने माझ्या स्वतःच्या संपूर्णपणे मालकीचे आहेत, त्यास इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. तरी नियमाप्रमाणे त्यांचे तारणावर कर्ज द्यावे ही विनंती.

अर्जदाराची सही

### गोल्ड व्हॅल्युअरचा शिफारस दाखला

सर्टिफिकेट देण्यात येते की, वर अर्जात नमुद केलेल्या सोने / चांदीचे दागिन्यांची मी तपासणी केली असून त्याबद्दल कर्जदारास क्रमांक ____________ ची पावती दिली आहे. त्या दागिन्यांमध्ये निव्वळ सोने ९९ टंची सोने / चांदी ____ ग्रॅम निघेल. त्याची किंमत रुपये ______________________ झाली आहे.

त्यावर रुपये ______________________ कर्जाऊ देण्यास शिफारस आहे.

गोल्डव्हॅल्युअर तारीख / / २०

मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. निर्मलनगर, अहमदनगर

# कर्जरोखा

**सोने / चांदीचे दागिने व जिनसा तारण ठेवून घेतलेल्या कर्जाबद्दल**

मी ____________________

वय __________ व्यवसाय __________ राहणार __________

लिहून देतो की,

ज्या अर्थी मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. निर्मलनगर या संस्थेने मा. संचालक मंडळ सभा तारीख / / २० ठराव अन्वये मला सोने / चांदीचे दागिने तारण ठेवलेल्या जिनसाच्या तारणावर रुपये __________ ची कर्ज मर्यादा मी संस्थेस योग्य रितीने अलहिदा करुन दिलेल्या करारनाम्यानुसार व त्यातील अटीनुसार मंजूर केलेली आहे. आणि ज्या अर्थी त्या कर्जासाठी त्याच दिवशी मी योग्य रितीने सह्या करुन रुपये __________ (अक्षरी रु. __________ ची वचन चिठ्ठी सोसायटीस दिली आहे. त्या अर्थी मी वर नमूद केल्याप्रमाणे सह्या करुन दिलेली रु. __________ ची वचन चिठ्ठी (प्रॉमिसरी नोट) ही सतत चालू राहणारे तारण राहील व समजले जाईल व आमचेकडे सोसायटीच्या हल्ली येणे असलेल्या व येथून पुढे कोणत्याही खात्यावर अगर दुसऱ्या कोणत्याही खात्यावर येणे होणाऱ्या रकमेचे वसुलीसाठी जरी इतर कोणत्याही खात्यावर सोसायटीकडे आमची रक्कम जमा असेल अगर जरी वरील खात्यावर काहीही देणे बाकी नसेल तरीसुध्दा ती वचन चिठ्ठी (प्रॉमिसरी नोट) आमचेवर बंधनकारक राहील हे मला मान्य आहे व असे लेखान्वये कबूल करतो.

१) मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. यांचे कडून रुपये __________ अक्षरी रुपये __________ चा अर्जात नमूद केलेला माझे स्वताःचे मालकीचा व निर्वेध असलेला माल संस्थेने आपल्या ताब्यात घेऊन त्या मालावर दर शेकडा __________ टक्के मार्जिन ठेऊन बाकी रक्कम रु. दरसाल दर शेकडा या दराने व्याजाने देण्याबद्दल माझा अर्ज मंजूर केला आहे त्याप्रमाणे माल मी संस्थेच्या ताब्यात देऊन सोसायटीचे नियमाप्रमाणे दर मंजूर केलेली रक्कम रुपये __________ अक्षरी रुपये __________ कर्जाऊ घेतली आहे व सदर रकमेची प्रॉमिसरी नोट खाली लिहून दिली आहे. सदर कर्जाची फेड मी आजपासून एक वर्षात करीन, सदरचे कर्ज __________ करीता घेतले आहे.

२) मी सोसायटीचा सभासद असून सोसायटीचे पोटनियम व सोने चांदी व सोन्याचे दागिने व जिनसा तारण ठेऊन कर्ज देण्याबाबतचे सोसायटीने केलेल्या नियम व अटी वाचून व समजून घेतल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक आहेत. व त्याप्रमाणे वागण्याचे मी कबूल करतो व तसे वागण्यास मी बांधील आहे.

३) माझ्याजवळ २००० ग्रॅमपेक्षा कमी असलेल्या सोन्यापैकी आज आपल्या सोसायटीकडे सोन्याचे दागिने गहाण ठेवीत आहे माझ्या स्वतःचे एकूण सोन्याचे दागिने २००० ग्रॅमपेक्षा कमी असल्यामुळे हे सदरहू सोने मी सरकारकडे कळविले नाही.

४) या व्यवहाराचा उलगडा करण्याचा प्रसंग दुदैवाने माझे हयातीनंतर आल्यास माझे जिन्नस या लेखान्वये

श्री. / सौ. ______________________ पत्ता ______________________

वय __________ धंदा ______________ यांचेकडून सोसायटीस सर्व प्रथम वसूल करुन घेऊन नंतर त्यास देऊन याची पावती घ्यावी म्हणजे मग माझे वाली वारस यांना सदर जिनसा बाबतीत कोणत्याही प्रकारची तक्रार करण्याचा अधिकार राहणार नाही.

५) यदाकदाचित केव्हाही सदर करारनाम्यात स्टॅम्प कमी लागल्याने निष्पन्न झाल्यास अगर स्टॅम्प ड्यूटी कायद्यात होणाऱ्या बदलास अनुसरुने आम्ही सदर स्टॅम्प व त्यावर लागणारी पेनल्टी भरुन देऊ. त्याबद्दल संस्थेस तोषीस लागू देणार नाही. सोसायटीस सदर पैसे व स्टॅम्प पेनल्टी भरावी लागल्यास ती आमच्याकडून द.म.द.शे. टक्के प्रमाणे व्याजासह वसूल करण्याचा अगर आमचे खाती नावे टाकण्याचा या करारनाम्यान्वये सोसायटीस अधिकार आहे व राहील.

६) तसेच व्याजाचे अगर या कर्ज अर्जाचे बाबत रिझर्व बँकेचे जे आदेश येतील त्यानुसार व सोसायटीचे पोटनियम / कर्जविषयक नियमानुसार सोसायटी जो व्याजदर वगैरे बदल करील तो मला मान्य आहे. त्याबाबत मी कोणतीही तक्रार करणार नाही.

७) सोसायटी कर्जरोख्यात ज्या कारणासाठी कर्जाची आवश्यकता आहे असे नमुद केलेले आहे. त्या कारणासाठीच सदर रक्कम वापरण्यात येईल असे देत आहे.

तारीख / / २०

कर्जदाराची सही

---

## डिमांड प्रॉमिसरी नोट

अहमदनगर दिनांक / / २०

मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.,निर्मलनगर / शाखा ______________ यांचे पासून आज रोजी मी रक्कम रुपये ( ) अक्षरी रुपये ______________________ द.सा.द.शे. रुपये प्रमाणे दर तिमाहीस व्याज कर्ज खात्यावर नांवे लिहिण्यांच्या अटीवर घेत आहे. सदरची रक्कम व्याजासह कर्ज मुदतीत सोसायटी मागेल त्यावेळी देण्याचे मी वचन देतो.

सही




---

## पेमेंटबाबत आदेश

सोबतचा कर्जमागणी अर्ज मंजूर केला आहे. रुपये ______________ अक्षरी रुपये ______________

______________________________________________

वरील सोने / सांदीचे दागिन्यांचे तारणावर कर्जाची रक्कम अदा करावी.

ज्युनि. / सिनी. ऑफिसर / शाखाधिकारी

# मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि., निर्मलनगर, अ.नगर

## सोने अगर सोन्याचे दागिने व चांदी अगर चांदीचे दागिने व जिनसा यांचे तारणावर

## कर्ज मिळण्याचे नियम

१) सोसायटीचा सभासद झाल्याशिवाय कोणत्याही इसमाबरोबर व्यवहार केला जाणार नाही.

२) एका सभासदास अशा प्रकारच्या तारणावर एकूण जास्तीत जास्त किती मर्यादेपर्यंत कमीत कमी कर्ज दिले जावे हे ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास असून त्यांनी ठरविलेल्या मर्यादेतच कर्ज दिले जाईल.

३) सोन्याचे तारणावर बाजारभावाप्रमाणे होणाऱ्या रकमेच्या ८०% व चांदीचे तारणावर बाजारभावाप्रमाणे होणाऱ्या रकमेवर ५०% पर्यंत संचालक मंडळ अगर संचालक मंडळाने नेमलेल्या कमिटीच्या अगर संचालक मंडळाने ज्यास अधिकार दिला असेल अशा संस्था अधिकाऱ्यांच्या मंजूरीप्रमाणे कर्जाऊ रक्कम दिली जाईल. सोन्याचांदीचे बाजार भाव संचालक मंडळ वेळोवेळी ठरविल.

४) तारण ठेवण्यास आलेले सोने चांदी अगर सोन्या चांदीचे दागिने व जिनसा संचालक मंडळाने नेमलेल्या गोल्ड व्हॅल्युअरला दाखवून त्याजकडून सर्टिफिकेट सोसायटीत आल्यावर कर्ज दिले जाईल.

५) गहाण ठेवण्यात आलेल्या मालात निव्वळ सोने अगर चांदी किती आहे. त्याबद्दल दाखला (Certificate) देण्यासाठी नेमलेल्या गोल्ड व्हॅल्युअरचे कमीशन गहान ठेवणाऱ्याने द्यावे संचालक मंडळाने ठरविलेल्या दराप्रमाणे होणारी कमिशनची रक्कम दिली पाहिजे, सदरची रक्कम दिल्याशिवाय कर्ज दिले जाणार नाही.

६) सोसायटीच्या ताब्यात जिनसा मिळाल्याबद्दल गोल्ड व्हॅल्युअरची सहीची जी पावती खातेदारास दिली जाते ती सांभाळून ठेवून खाते बंद करुन गहाण ठेवलेल्या जिनसा परत घेतांना संस्थेस दिली पाहिजे. सदरची पावती सोसाटीस परत दिल्याशिवाय गहाण ठेवलेल्या जिनसा परत देणे किंवा न देणे हे ठरविण्याचा हक्क संचालक मंडळास राहील.

७) सोन्या चांदीचे तारणावर कर्जावर व्याज वेळोवेळी संचालक मंडळ ठरवील त्या दराने व्याज घेण्यात येईल.

८) कर्जदाराने व्याज दरमहा भरले पाहिजे तसे न भरले गेल्यास सदर सदर त्याचे कर्ज खाती नावे टाकले जाईल.

९) कर्जाऊ घेतलेली रक्कम १२ महिन्याच्या आत पुरी देऊन व्यवहार बंद केला पाहिजे. १२ महिन्यानंतर पुढे माल ठेवणे किंवा न ठेवणे हे संचालक मंडळाचे मर्जीवर अवलंबुन राहील. एक महिन्याचे आत खाते बंद केल्यास पुर्ण एक महिन्याचे व्याज घेतले जाईल. तसेच बाजार भावात एकदम घट आहे असे संचालक मंडळास वाटल्यास तीन दिवसाची नोटीस देऊन संबंध रक्कमेची मागणी करण्यास सोसायटीस हक्क असून सोसायच्या मागणीप्रमाणे मुदतीत रक्कम न भरल्यास सोसायटी मालाची विक्री करुन रक्कम वसुल करील. त्याप्रमाणे कर्जाची मुदत संपल्यावर रक्कम न भरल्यास २ % प्रमाणे दंडाचे व्याज आकारले जाईल व ते मला मान्य आहे.

१०) मालाचे भावात उतार झाल्यास सोसायटीत मागणीप्रमाणे जास्त तारण अगर कर्जाऊ घेतलेली रक्कम व्याजासह कर्जदाराने बँकेने ठरविलेल्या मुदतीत भरली पाहिजे.

११) कर्जदाराने घेतलेल्या रकमेबद्दल वेगळी डिमांड प्रॉमिसरी नोट लिहून दिल्याशिवाय कर्जाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१२) कर्जदार मयत झाल्यास संचालक मंडळाच्या संमतीशिवाय गहाण ठेवलेला माल परत केला जाणार नाही.

१३) सोसायटीच्या ताब्यात माल देतांना लेखी पावती घेणे व परत घेतांना लेखी पावती देणे आवश्यक आहे.

१४) नियम नं. ८ प्रमाणे मुदतीत व्याज न भरल्यास नियम नं. ९ प्रमाणे रक्कम पुरी देऊन मुदतीत खाते बंद न केल्यास व नियम नं. १० प्रमाणे तारण ठेवलेल्या मालाचे किमतीत उतारा झाल्यास सोसायटीने मागणी प्रमाणे मार्जीनची रक्कम न भरल्यास अगर जादा तारण न दिल्यास सोसायटीकडे गहाण ठेवलेला माल संस्थेस बाजार भावाप्रमाणे विकून टाकण्याचा पुर्ण अधिकार आहे. या कामी नोटीस देणे सोसायटीच्या मर्जीवर राहील.

१५) सोसायटीचे नियम मोडल्यामुळे मालाची विक्री करुनही कर्जदाराकडून येणे असलेल्या रक्कमेपेक्षा कमी रक्कम वसूल झाल्यास बाकीची रक्कम कर्जदाराकडून वसूल करण्याचा सोसायटीचा अधिकार आहे. यासाठी होणारा खर्च कर्जदाराकडून वसूल केला जाईल.

१६) कोणत्याही नियमाचे उल्लंघन केल्यामुळे संस्थेच्या एजंटमार्फत मालाची विक्री केल्यास त्या बाबतीत कर्जदाराची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही सदर विक्रीचा सर्व खर्च कर्जदारावर राहील.

१७) ज्या व्यक्तिस कर्जाऊ रक्कम पाहिजे असेल त्याने संस्थेने ठरविलेल्या छापील नमुन्याचा अर्ज दिला पाहिजे व तो मंजूर झाला म्हणजे व्यवहारास सुरुवात होईल.

१८) ज्या सभासदाने सोन्याचे तारणावर कर्ज घेतले आहे. मात्र दोन तिमाही व्याज थकलेले आहे. अशा कर्जदारास नोटीस पाठवून व्याज न भरल्यास दागिण्याचा लिलाव करुन रक्कम वसूल करण्यांत येईल.

१९) सोने तारण / चांदी तारण कर्जाची एक वर्षाची मुदत संपल्यानंतर रक्कम भरुन खाते बंद न केल्यास अगर नुतनीकरण न केल्यास अशा थकबाकीदाराच्या दागिण्याचा त्वरीत लिलाव करण्यात येईल.

२०) आगाऊ सूचना न देता कोणतेही वरीलपैकी काही अगर सर्व नियमात फेरफार करण्याचा, त्यातील मजकूर कमी करण्याचा अगर त्यात अधिक मजकुर घालण्याचा अधिकार संचालक मंडळाने आपणाकडे राखून ठेवला आहे.

तारीख / / २०

कर्जदाराची सही

श्री./सौ. ................................................................................

पत्ता-- ................................................................................

................................................................................

मोबा. नं.--..........................................................................

दिनांक-- / /202

प्रति,

मा. शाखा व्यवस्थापक,

मंगलदीप मल्टि. अर्बन को. ऑप. के. सोसा. लि.

निर्मलनगर, पाईपलाईन रोड, सावेडी,

अहमदनगर.

विषय : सोने तारण कर्जाकरिता गहाण ठेवण्यात येणाऱ्या दागिन्यांच्या पावतीबाबत....

महोदय/महोदया,

मी खाली सही करणार श्री./सौ. ................................................................................

सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो/देते कि, मी आपल्या सोसायटीमधून सोन्याच्या दागिन्यांवर सोनेतारण कर्ज घेत आहे. सादरच्या कर्जाकरिता गहाण ठेवण्यात येणाऱ्या दागिन्यांच्या पावत्या माझ्याकडून गहाळ झाल्या आहेत/सापडत नाहीत.

तरी सादरच्या अर्जानुसार आपणास लिहून देण्यात येते कि, मी सोने तारण कर्जाकरिता गहाण ठेवीत असलेले सर्व दागिने माझ्या मालकीचे असून त्याबाबत काहीही प्रश्न उद्भवल्यास त्यास मी सर्वस्वी स्वतः जबाबदार आहे. तरी सादरच्या दागिन्यांच्या तारणावर मला सोने तारण कर्ज मंजूर करावे ही विनंती.

आपला/आपली विश्वासू